**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांच्या व इतर अनुषंगिक बांधकामाच्या दर्जाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक- स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४८/नवि-३४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१७

**पहा :**

१) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र. स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४८/नवि-३४ दि. २० नोव्हेंबर, २०१५.
२) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र. स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४८/नवि-३४ दि. १ डिसेंबर, २०१६.
३) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र.७४/नवि-३४ दि. २३ मे, २०१७.

**परिपत्रक :**

राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी मिशन मोड पध्दतीने सुरु आहे. या अभियानांतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयाच्या व इतर अनुषंगीक बांधकामाच्या दर्जाबाबत सूचना देऊन व सदर सुचनांचे पालन करण्याबाबत संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत बांधण्यात येणारी शौचालये ही केवळ ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी बांधावयाची नसून, या अभियानातंर्गत बांधण्यात येत असलेल्या शौचालयांचा वापर हा संबंधित लाभार्थी कुटुंबाने नियमितपणे करणे अपेक्षित आहे. त्यासाठी या अभियानांतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांच्या बांधकामाचा दर्जा चांगला असेल, तरच संबंधित शहरांचे हागणदारी मुक्ती मध्ये सातत्य राहू शकेल.

३. उपरोक्त परिच्छेदात नमूद वस्तूस्थिती विचारात घेता शासन पुढील प्रमाणे सूचना देत आहे:-

(१) सार्वजनिक / सामुदायिक / वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी कोणत्याही परिस्थितीत प्रीफॅब्रीकेटेड (Prefabricated) साहित्याचा वापर करण्यात येवू नये.
(२) सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय बांधकामासाठी कोणत्याही परिस्थितीत प्रीकास्ट (Pre-cast) साहित्याचा वापर करण्यात येवू नये.
(३) सार्वजनिक / सामुदायिक शौचालयांचे बांधकाम हे बांधकाम साहित्याचा ( विटा, सिमेंट व रेती इत्यादीचा) वापर करून करण्यात यावे.
(४) वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी प्रीकास्ट (Pre-cast) साहित्याचा वापर करताना, त्या साहित्याचा दर्जा संदर्भाधिन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकासोबत जोडलेल्या जोडपत्र - १ मध्ये दिलेल्या तांत्रिक तपशिलानुसार आहे याची खात्री करून घेवूनच वापर करण्यात यावा.

(५) संदर्भीय क्रमांक ३ येथील दिनांक २३ मे, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम करताना कोणतीही संस्थात्मक अडचण जसे, सर्वसाधारण सभेची मान्यता ही अडसर ठरविण्यात येवू नये.

(६) शहर हागणदारी मुक्त करण्यासाठी बांधण्यात येणारी सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची संख्या ५ पेक्षा अधिक असल्यास एवढया मोठया संख्येने सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांचे बाधकाम करण्यासाठीची आवश्यकता विशद करून त्यास संबंधित जिल्हाधिकारी यांची मान्यता घेण्यात यावी.

४. उपरोक्त सुचनांचे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोरपणे पालन करावे. या सूचनांचे पालन न झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०८१६१६२८२५१०२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.08.16 16:18:54 +05'30'

**( सुधाकर ज्ञा. बोबडे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति :**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) नगराध्यक्ष, नगरपरिषदा/ नगरपंचायती (सर्व)
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
६) प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) विभागीय आयुक्त (सर्व)
८) जिल्हाधिकारी (सर्व)
९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१०) सह सचिव (अर्थसंकल्प) नगर विकास विभाग, मुंबई
११) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई
१३) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
१४) उप संचालक, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१५) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१६) निवडनस्ती, नवि-३४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.